लोक शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा

# लोक महाविद्यालय, वर्धा

## भूगोल विभाग



# मानवी भूगोल

## सेमिस्टर -४



# १. मानवी भूगोल
## (Human Geography)

**प्रश्न १ : मानवी भूगोल म्हणजे काय ते सांगून महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर : (१) इग्रेजोन्स :** "मानवी भूगोल म्हणजे निसर्ग व मानव यांचा परस्परसंबंध होय."

**(२) कुमारी एलन सेंपल :** "अस्थिर पृथ्वी व क्रियाशील मानव यांच्यातील सतत बदलणाऱ्या संबंधाचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय. परिवर्तनशील व गतिशील असे हे शास्त्र आहे."

**(३) रॅटझेल :** "भौगोलिक पर्यावरणाचा प्रभावी परिणाम मानवावर घडून येतो. त्या परिणामाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो."

**(४) हन्टिन्टन :** "भौगोलिक पर्यावरण व कुशल कार्यगुणांचा मानव यांच्यासंबंधीची माहिती मानवी भूगोलात स्पष्ट केली जाते. मानवी क्रिया-प्रक्रियांचा भौगोलिक प्राकृतिक पर्यावरणाशी जो संबंध येतो, त्याचे स्पष्टीकरण मानवी भूगोलातून मिळते."

**(५) विडाल – डे – ला ब्लाश :** "मानवी भूगोल हा एक नवीन अभ्यासाचा विषय असून त्यातून नैसर्गिक वातावरण व मानव यांचा संबंध स्पष्ट होतो. नैसर्गिक नियमांच्या प्रभावामुळे मानवी जीवन बदलत असते. मानवी भूगोल ही विज्ञानाचीच एक शाखा आहे."

**(६) ब्रून्हस :** "मानवी भूगोलात नैसर्गिक प्राकृतिक रचना व मानवी कौशल्य यांच्यामधील समायोजनाचे स्पष्टीकरण केले जाते."

**(७) व्हाईट व रेनर :** "नैसर्गिक पर्यावरणात मानव निसर्गाशी समायोजन करतो व स्वत:चा जीवनमार्ग कंठण्याची धडपड करतो. या निसर्ग-मानव समायोजनाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो."

**(८) डिमॉंजिऑन (Demangeon) :** "निसर्गाचा प्रभाव, प्राकृतिक भू-रचनेचा प्रभाव मानवी क्रियांवर होतो तसेच मानवी वसाहतींवरही होतो. नैसर्गिक भू-दृश्यांवर मानवाचे महत्त्व मोठे आहे. मानवी प्रभाव मोठा असतो. या सर्व विविध वसाहतींचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो."

**(९) डेविस (Davis W.M.) :** "प्राकृतिक पर्यावरण व मानवी क्रिया यांच्या परस्परसंबंधातून त्यांच्या अंतिम उद्दिष्टांचे ज्ञान मानवी भूगोलात केले जाते व त्यातही निसर्गावर नियंत्रण आणण्याचा जो प्रयत्न करतो, त्याचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो."

मानवी भूगोलाचे स्वरूप सतत परिवर्तनशील असून त्याची व्याप्ती सर्वसमावेशक आहे. या अभ्यासात खूप विविधता आढळते व त्यातून सतत निसर्ग व मानव यांच्या संबंधाची माहिती मिळते.

**मानवी भूगोल : विषयसामग्री (Subject Matter) :**

मानवी भूगोलात नैसर्गिक पर्यावरणाच्या व सांस्कृतिक पर्यावरणाच्या घटकांचा मानवी विकासावर कसा बदल घडून येतो व निसर्ग-मानव यांच्यातील क्रिया-प्रक्रियांचे कोणते परिणाम घडून येतात याचे विवेचन केलेले असते. त्या दृष्टीने "भौगोलिक पर्यावरण व मानवाचे कार्यगुण यांच्या वितरणाचा व संबंधांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल" ही हन्टिन्टनची व्याख्या अधिक समर्पक आहे. कुमारी सेंपलची व्याख्याही अर्थपूर्ण असून निसर्ग-मानव संबंधात "क्रियाशील मानव व अस्थिर पृथ्वी यांच्या परिवर्तनाचा अभ्यास मानवी भूगोलात करावा" असे तिचे मत आहे.

**मानवी भूविज्ञानाचे महत्त्व (Importance) :**

भौतिक परिस्थितीत मानवाच्या कार्यकारणसंबंधाचे स्पष्टीकरण करणे, निसर्ग व मानव यांच्यातील क्रिया-प्रक्रियांचे व परस्परावलंबनाचे तत्त्व समजून घेणे, मानवाने निसर्गात घडविलेला बदल व निसर्गात मानवाने केलेला बदल (परिणाम) यांची माहिती घेणे, बदलत्या प्राकृतिक व नैसर्गिक परिस्थितीबरोबर बदलणाऱ्या मानवी जीवनाचा आलेख समजून घेणे हे मानवी भूगोलाचे प्रमुख उद्देश आहेत. मानवी भूगोलाच्या व्याख्यांचे स्पष्टीकरण या आधी केलेले आहे. त्यावरून मानवी भूगोलाचे स्वरूप व त्यांच्या अभ्यासविषयांची व्याप्ती स्पष्ट होते. सतत बदलणाऱ्या, अस्थिर, पृथ्वीवर कार्यक्षम मानवाचे जीवनदर्शन मानवी भूगोलातून मिळते. म्हणजे मानवी

भूगोलाच्या व्याप्तीमध्ये (कार्यक्षेत्रात) निसर्गाशी संबंधित मानवी व्यवहारांचा, व्यवसायांचा व मानवाशी संबंधित निसर्गातील घटकांचा अभ्यास येतो. पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण शक्तीचा प्रभाव सर्व भौतिक घटकांवर घडून येतो. ब्रून्हस या शास्त्रज्ञाने या शक्तीला 'बुद्धिमान शक्ती' म्हटले आहे. कारण पृथ्वीवर स्थिरता, नियंत्रण व सर्व घटकांमध्ये संतुलन राखण्याचे कार्य ही गुरुत्वाकर्षण शक्ती करीत असते. भूतकाळातील भू-पृष्ठरचना व प्राकृतिक रचना या भविष्यकाळात बदलतील. आजच्या पर्वतमय पठारी भू-पृष्ठरचना कालांतराने विदारित होतील व त्यांच्या जागी मैदाने निर्माण होतील. पर्वतमय प्रदेशातील मानवी जीवन हे मैदानी प्रदेशातील मानवी जीवनापेक्षा वेगळे असते. म्हणूनच प्राकृतिक रचनांना जसे एक 'विकास चक्र' असते तसेच विकास चक्र सजीव सृष्टीला व मानवी जीवनाला असते. या बदलणाऱ्या स्थिती मानवी भूगोलाच्या व्याप्तीमध्ये स्पष्ट समजून येऊ शकतात. नैसर्गिक विकासचक्राचा वनस्पती, सजीव प्राणी यांच्यावर परिणाम होत असतो.

पृथ्वीवरील अनेक मूलभूत द्रव्ये बदलत्या स्वरूपाची, संपुष्टात येणारी व ज्यांची पुनर्निर्मिती करता येत नाही अशा स्वरूपाची आहेत. आजच्या मानवी गरजा उद्या तशाच राहणार नाहीत. त्यात खूप बदल घडून आलेला असेल. संपणारे खनिज साठे पुन्हा निर्माण करता येणार नाहीत तर ते पृथ्वीच्या कवचात संशोधनाने, बुद्धीच्या कौशल्यावर शोधावे लागतात. असे साठे सापडले नाहीत तर मानवाला 'ठेविले अनंते' असेच रहावे लागते. सौरशक्तीचा प्रभाव मानवी जीवनावर, बाष्पीभवनावर, पर्जन्यवृष्टीवर होतो. परिवलन परिभ्रमणाचा परिणाम वाऱ्यांच्या दिशांवर व ऋतुमानावर आणि अप्रत्यक्षरित्या मानवी जीवनावर होत असतो. हे सर्व घडत असताना प्रत्येक नैसर्गिक व अनैसर्गिक घटकांचा समतोल साधण्याचे कार्यही पृथ्वीवर आपोआप घडून येते.

**प्रश्न २ : मानवी भूगोलाची व्याप्ती (Scope)**

**उत्तर :** निसर्ग व मानव यांच्यातील परस्पर समायोजनाचा अभ्यास मानवी भूगोलात येतो व मानवी भूगोलाचे कार्यक्षेत्र मानवसंबंधित सर्व घटकांपर्यंत पोहोचते हे आपणास समजून येते. नैसर्गिक घटक, सौरशक्ती, वनस्पती, माती, वारा, खनिज, पक्षी इत्यादींचा एकत्रितपणे मानवी हितासाठी वापर होतो. म्हणून त्यांचा एकत्रितपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. निसर्गात मानवी क्रिया-प्रक्रियांचा अभ्यास करण्याचा मुख्य हेतू त्यामुळे साध्य होतो. नैसर्गिक घटकांचे गुणधर्म त्यामुळे कळून येतात. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी सर्व शास्त्रे मानवाने पृथ्वीवर निर्माण केलेली आहेत. भूगोल हे या सर्व शास्त्रांचे शास्त्र, शास्त्रांची जननी म्हणून मान्य पावलेले आहे. सूक्ष्म अभ्यासासाठी त्याचे प्राकृतिक भूगोल, राजकीय भूगोल, आर्थिक भूगोल, मानवी भूगोल, भूगर्भशास्त्र, हवामानशास्त्र इत्यादी प्रकार केलेले आहेत. भूगोलाच्या आधारावरच इतिहास जगतो. भूपृष्ठावर इतिहासाच्या घटना घडतात. उंच पर्वत, खोल दऱ्या व सागरी बेटे नैसर्गिक व ऐतिहासिक संरक्षणाच्या दृष्टीने सुरक्षित भाग होत. राजकीय भूगोलातील विश्वबंधुत्वाची कल्पना सर्व पृथ्वीवर मानवतेच्या प्रसारासाठी, एक मानव-एक विश्व व विश्वशांतता यांच्यासाठीच निर्माण झालेली आहे. मानवी भूगोलाची व्याप्ती अशाप्रकारे सर्वसमावेशक व मोठी आहे. मानवी भूगोलाचे स्वरूपही गतिमान व परिवर्तनशील आहे.

**प्रश्न ३ : मानवी भूगोलाचे स्वरूप स्पष्ट करा. (Nature)**

**उत्तर** : मानवी भूगोलाची व्याप्ती जसजशी सर्वसमावेशक होत गेली तसतसे मानवी भूगोलाचे स्वरूप बदलत गेले. या मानवी भूगोलाच्या स्वरूपामध्ये परिवर्तन झाले. गतिमानता आली. प्रगत विचार आले. निसर्गाचे नवनवीन ज्ञान मानवाला उपलब्ध होत गेले. या ज्ञानाबरोबरच निसर्गाचा उपयोग करून घेण्याचे कौशल्य माहीत झाले. पूर्वी नदीचे पाणी उताराने वाहत जाऊन समुद्राला मिळत होते व वाया जात होते. जसे मानवाला धरणाचे पाणी अडविण्याचे व पाण्यापासून वीजनिर्मितीचे ज्ञान प्राप्त झाले, तशी नदीची उपयुक्तता वाढली. नदीवर धरण बांधून त्या पाण्यावर वीज निर्माण करता आली. त्या नदीचे पाणी कालव्यामार्फत दुष्काळी भागाला पुरविण्यात आले. नदीच्या पाण्याची उपयुक्तता वाढली. त्यातून मानवी भूगोलाचा विकास झाला. निसर्गातील घटक मानवाला उपयोगी पडतात. मानवाच्या गरजा निसर्गातील घटकांमधून भागतात (अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी) हे मानवाला ज्ञात झाले व मानवी भूगोलाचे स्वरूप बदलले. निसर्गातील व मानवी घटकांच्या या परिवर्तनामध्ये **'विकास चक्र'** असते. प्रत्येक घटकाला बाल्यावस्था, युवावस्था, प्रौढावस्था व वृद्धावस्था असते. विकासचक्राच्या या अवस्थांमधून जाताना घटकांमध्ये परिवर्तन होते. कालमानानुसार हे परिवर्तन गतिमान असते. ते थांबत नाही. त्याला गती आहे.

मानवी हालचालींचे नियंत्रण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक पर्यावरण करीत असते. **पृथ्वीवर सर्वत्र नैसर्गिक परिस्थिती सारखी नाही.** नैसर्गिक परिस्थितीचे वितरण पृथ्वीवर अत्यंत असमान झालेले आहे. त्या वितरणात व नैसर्गिक परिस्थितीमध्ये विविधता आहे. हवामानात, मृदाप्रकारात वनस्पती, प्राणी व मानवी जीवनात, प्राकृतिक रचनेत विविधता आहे. या विविधतेमध्ये कालचक्रानुसार

होणारे परिवर्तन मानवी भूगोलाच्या अभ्यासाचा मुख्य विषय बनलेले आहे. पृथ्वीवर मानवाची घरे,पोशाख, व्यवसाय, शरीररचना, अन्न सवयी, चालीरीती यांच्यात विविधता आहे. त्यामुळे सतत बदलणाऱ्या मानवी संस्कृतीच्या विकासाचे अध्ययन मानवी भूगोलात करतात.

थोडक्यात, म्हणजे जसजसा विज्ञानाचा विकास होईल, नवनवीन शोध लागतील तसतसा मानवी जीवनाचाही विकास होईल. मानव अधिक प्रगतीचे मार्ग शोधू लागेल. व्यवसायांचे स्वरूप बदलेल. पारंपरिक हत्यारे, अवजारे, शेती उद्योगाच्या पद्धती बदलतील. यंत्रयुगामुळे सर्वत्र उत्पादनक्रांती झाली. मानवाचे परिवर्तन, निसर्गाचे परिवर्तन मानवी भूगोलाच्या अभ्यासाचा प्रमुख विषय बनला आहे. हळूहळू या अभ्यासात अधिक शास्त्रीयता येईल. विषयाची उपयुक्तता वाढेल. मानवी भूगोलाचा सर्वच सामाजिक, आर्थिक, भौतिक विज्ञानाशी संबंध आला. त्यामुळे मानवी भूगोलाच्या अनेक ज्ञानशाखा निर्माण झाल्या. अर्थशास्त्राशी संबंध येऊन आर्थिक भूगोल, इतिहासाशी संबंध येऊन ऐतिहासिक भूगोल, राज्यशास्त्राशी संबंध येऊन राजकीय भूगोल, समाजशास्त्राशी संबंध येऊन हवाममानशास्त्र, वनस्पतीशास्त्राशी संबंध येऊन वनस्पती भूगोल इत्यादी विविध मानवी भूगोलाच्या ज्ञानशाखा निर्माण झाल्या.

**प्रश्न ४ : मानवी भूगोलाच्या शाखा सांगा. (Branches)**

**उत्तर :** मानवी वर्तन, मानवी सजीव क्रिया आणि जीवनपद्धती यांचा अभ्यास प्राकृतिक पर्यावरणाच्या संदर्भात मानवी भूगोलामध्ये शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो. आर्थिक, सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक अशाप्रकारे मानवी वर्तन असते. यामुळे मानवी भूगोलाचा अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास या सामाजिकशास्त्रांशी निकटचा संबंध प्रस्थापित झाल्यामुळे यातून अनेक शाखांची निर्मिती झाली आहे. मानवी भूगोलाच्या प्रमुख महत्त्वाच्या शाखा पुढीलप्रमाणे आहेत.

**मानवी भूगोल**

| आर्थिक भूगोल | सामाजिक भूगोल | राजकीय भूगोल | ऐतिहासिक भूगोल | लोकसंख्या भूगोल | वांशिक भूगोल |
|---|---|---|---|---|---|

**(१) आर्थिक भूगोल :** प्रसिद्ध जर्मन भूगोलतज्ज्ञ गॉल्झ याने आर्थिक भूगोल ही संकल्पना मानवी भूगोलात रूढ केली. गॉल्झच्या मते, ''मानवाच्या आर्थिक क्रियांच्या प्रादेशिक वितरणाचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.'' पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने, उत्पादने, मानवाच्या आर्थिक क्रिया यांचा अभ्यास आर्थिक भूगोलामध्ये केला जातो. संसाधन भूगोल, औद्योगिक भूगोल, कृषी भूगोल, वाहतूक व व्यापारी भूगोल या आर्थिक भूगोलाच्या शाखा महत्वपूर्ण मानल्या जातात. जगाच्या लोकसंख्येचा अभ्यासही आर्थिक भूगोलाच्या माध्यमातून पूर्ण केला जातो.

**(२) सामाजिक भूगोल :** प्रत्येक मानव समूहात राहून जीवनकार्य व्यतीत करीत असतो. यामुळे मानवाला समाजशील प्राणी असे म्हटले जाते. **स्टॅनबो** या भूगोलतज्ज्ञाने मानवी भूगोलात सामाजिक भूगोलाचे महत्त्व सर्वप्रथम पटवून दिले. सामाजिक भूगोलात व्यक्तीचा किंवा मानवाचा स्वतंत्र अभ्यास केला जात नाही तर संपूर्ण सामुहिक मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. मानव समाजाचा विकास, मानवी संस्कृती यांच्या परिणामाचा अभ्यास सामाजिक भूगोलात शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो. यामुळे सामाजिक भूगोल व समाजशास्त्र यांचा जवळचा संबंध निर्माण होतो. ग्रामीण भूगोल, नागरी भूगोल, सांस्कृतिक व वसाहत भूगोल अशाप्रकारच्या अनेक उपशाखा सामाजिक भूगोलातून निर्माण होतात.

**(३) राजकीय भूगोल :** पहिल्या महायुद्धानंतर राजकीय भूगोलाला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले. **फ्रेड्रिक रॅटझेल** या प्रसिद्ध जर्मन भूगोलतज्ज्ञाने राजकीय भूगोल या विषयाचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून दाखविले. मानवाच्या नैसर्गिक आंतरक्रियेचा प्रभाव राजकीय परिस्थितीवर नेहमी पडत असतो. जागतिक आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय व्यापार, परराष्ट्रीय व्यवहार धोरण, राज्यांच्या सीमा, राष्ट्रीय नैसर्गिक संपत्ती व लोकसंख्या इत्यादी प्रमुख घटकांचा राजकीय भूगोलामध्ये अभ्यास केला जातो.

**(४) ऐतिहासिक भूगोल :** प्रसिद्ध भूगोलतज्ज्ञ **शैलफर्ड मॅकिंडर** ऐतिहासिक भूगोलाचे महत्त्व सांगताना म्हणतो, ''इतिहासकालीन ऐतिहासिक कालखंडातील मानवी वर्तनावर भौगोलिक परिस्थितीच्या होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ऐतिहासिक भूगोल होय.'' मानवी वसाहती, वाहतूक मार्ग व व्यवसाय यांचे संयोजन करून भविष्यकालीन ऐतिहासिक भूगोलाच्या नियोजनास मदत होते. ऐतिहासिक भूगोलात प्राचीन इतिहासकालीन भौगोलिक घटकांचा विचार कालप्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन केला जातो.

**(५) लोकसंख्या भूगोल :** लोकसंख्या भूगोलाला मानवी भूगोलाची विशेष शाखा म्हणून ओळखल्या जाते. पृथ्वीवरील विविध प्रदेशातील भौगोलिक पर्यावरणाचा अभ्यास करून लोकसंख्येचे वितरण व वैशिष्ट्ये अभ्यासणारे शास्त्र म्हणजे लोकसंख्या भूगोल होय. ग्लेन त्रिवार्था या प्रसिद्ध भूगोलतज्ञाने इ.स. १९५३ मध्ये लोकसंख्या भूगोलाला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिले. लोकसंख्येची वाढ, घनता, वितरण, संरचना, गुणवत्ता इत्यादी घटकांचा अभ्यास लोकसंख्या भूगोलात केला जातो. लोकसंख्या भूगोलाची शाखा समृद्ध करण्याकरिता **बेजू गार्नियर, जॉर्ज डेम्को, लर्किन** इत्यादी भूगोलतज्ञांनी प्रयत्न केले.

**(६) मानववंश भूगोल :** जर्मन भूगोलतज्ञ **फ्रेड्रिक रॅटझेल** यांनी इ.स. १८८२ मध्ये 'ॲन्थ्रोपोजिऑग्राफी' हा ग्रंथ लिहून मानववंश भूगोलाला जागतिक स्थान प्राप्त करून दिले. मानवी वंशाची उत्क्रान्ती, वांशिक गुणविशेष, मानववंशाचे वर्गीकरण, यांचे जागतिक वितरण व जीवन पद्धतीचा अभ्यास मानववंश भूगोलामध्ये केला जातो. मानववंश भूगोलाचे महत्त्व पटवून देण्याकरिता बर्नियर, कुवियर, टोपीनार्ड, ग्रिफिथ टेलर इत्यादी भूगोलतज्ञांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

**प्रश्न ५ : मानवी भूगोलाची व्याप्ती स्पष्ट करा. (Scope)**

**(१) लोकसंख्या :** (अ) संख्या व घनता, (ब) वितरणप्रणाली.

**(२) वसाहती :** (अ) वसाहतींचे प्रकार, (ब) वसाहतींचे वितरण.

**(३) उत्पादन क्रिया :** (अ) शेतीचा आकार, शेतीयोग्य भूमीचे वितरण व शेतीचे प्रकार, (ब) उद्योगधंदे, जगातील औद्योगिक प्रदेश, (क) शोषक व्यवसाय – लाकूडतोड, मासेमारी, शिकार, खाणकाम इत्यादी.


**(४) वाहतूक व व्यापार :** (अ) वाहतूक मार्ग, (ब) दळणवळण व वाहतूक साधने, (क) आयात व निर्यात धोरण.

प्रसिद्ध भूगोलतज्ञ फिंच व त्रिवार्था यांनी आपल्या 'एलिमेंट्स ऑफ जिऑग्राफी' या ग्रंथात मानवी भूगोलाच्या विषयक्षेत्राची संकल्पना सांगितली. परंतु फिंच व त्रिवार्था यांनी केलेले विवेचन मर्यादित स्वरूपाचे व प्राथमिक असल्याचे मानल्या जाते.

**मानवी भूगोलाची हंटिंग्टनकृत व्याप्ती :**

हंटिंग्टन यांनी आपल्या 'प्रिन्सिपल्स ऑफ ह्युमन जिऑग्राफी' या ग्रंथात मानवी भूगोलाच्या विषयक्षेत्राची पुढीलप्रमाणे तपशीलवार मांडणी केली आहे.

**मानवी भूगोलाची हंटिंग्टनकृत व्याप्ती**




**मानवी संस्कृती व विकास**

भौतिक स्थिती व मानवी प्रतिसाद अशा दोन स्वतंत्र गटात मानवी भूगोलाच्या व्याप्तीचे विभाजन हंटिंग्टन यांनी केले. प्रत्येक घटकाचा परस्परांवर होणारा अंतर्गत परिणामही हंटिंग्टन यांनी स्पष्टपणे मांडला आहे. मानवाने बुद्धिचातुर्याच्या बळावर प्रत्येक घटकावर नियंत्रण ठेवून आपली क्रियाशीलता विकसित केली आहे. याच तत्वाला मानवी प्रतिसाद अशी संज्ञा **हंटिंग्टन** यांनी दिली आहे. वरील आकृतीवरून भूगोलाची व्याप्ती अतिशय पद्धतशीरपणे हंटिंग्टन यांनी स्पष्ट करून दाखविली आहे.

**मानवी भूगोलाचे विषयक्षेत्र :**

इ.स. १९१० मध्ये 'जिऑग्राफी ह्युमेन' या ग्रंथात प्रसिद्ध फ्रेंच भूगोलतज्ज्ञ **ब्रून्स** याने मानवी भूगोलाच्या व्याप्तीचे प्रमुख दोन गटात पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

**मानवी भूगोलाचे विषयक्षेत्र**

सांस्कृतिक विकास
- (१) मूलभूत गरजा
- (२) भूमी शोषण
- (३) सामाजिक भूगोल
- (४) राजकीय व ऐतिहासिक भूगोल

यथार्थ वर्गीकरण
- (अ) अनुत्पादक व्यवसाय
- (१) घर बांधणी, (२) वाहतूक मार्गनिर्मिती
- (ब) वृक्ष व पशू यावर विजय
- (३) कृषी, (४) पशुपालन
- (क) विध्वंसक व्यवसाय
- (५) वृक्षतोड, (६) शिकार व खाणकाम

●●●

# २. मानवी वंश
(Human Race)

**प्रश्न १ : मानवी वंश म्हणजे काय? मानवी वंशाचे वर्गीकरणाचे आधार किंवा निकष (Criteria) सांगून वर्गीकरण करा.**

**उत्तर :** ''निश्चित शारीरिक लक्षणे असणारे; पिढ्यान्‌पिढ्या प्रजनन होऊन जैविकदृष्ट्या संकरित झालेले मानव गट म्हणजे वंश,'' अशी सर्वसाधारणपणे वंशाची व्याख्या करता येऊ शकेल. समान शारीरिक गुणधर्माचा मानवी समूह दुसऱ्या भिन्न शारीरिक गुणधर्माच्या मानवी समूहापेक्षा वेगळा दिसतो. यातून वांशिक भिन्नता ओळखली जाते. वेगवेगळ्या मानववंशशास्त्रज्ञांनी निरनिराळ्या प्रकारे वंशाची व्याख्या केलेली आहे.

**ए.के. क्रोबर :** वंश ही जीवशास्त्रीय संकल्पना आहे. वंश म्हणजे आनुवंशिकतेच्या निकषावर संघटित होणारा समुदाय किंवा उपप्रकार होय.

(A race is a valid biological concept. It is a group united by heridity, a breed or genetic stain or sub-species.)

**ए.ई. वेलिस :** समान आनुवंशिक गुणवैशिष्ट्यांचा विशिष्ट संच प्रदर्शित करणारा मानवाचा एक नैसर्गिक गुण म्हणजे वंश.

**ई.ए. हॉबेल :** एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणाऱ्या विशिष्ट शारीरिक लक्षणांनी युक्त असा जीवशास्त्रीय समूह म्हणजे वंश होय.

(A race is a biological inbred group possessing a distinctive combination of physical traits which tend to breed from generation to generation.)

वैशिष्ट्यपूर्ण अशा शारीरिक लक्षणांमुळे मानव समूहातील परस्पर भिन्नत्व स्पष्ट होते. वंश हे जन्मजात शारीरिक लक्षणांच्या आधारे केलेले मानवजातीचे प्रमुख विभाजन आहे. वंश या संकल्पनेत मानवाने शिकून प्राप्त केलेल्या वर्तनावर अथवा गुणांवर भर न देता त्याच्या जन्मदत्त शारीरिक लक्षणांवर भर दिलेला असतो. त्यामुळे वंश ही जैविक स्वरूपाची संकल्पना आहे. वैज्ञानिक मानवशास्त्रामध्ये (Scientific Anthropology) सुद्धा वंश ही जैविक संकल्पना मानली जाते. जीवशास्त्रीयदृष्ट्या वंश हा अंत:प्रजोत्पादित (Inbred) व्यक्तींचा गट असतो. हा अर्थ वैज्ञानिकदृष्ट्या सर्वमान्य झाला असला तरीही हक्स्ले यांना तो मान्य नाही कारण जीवशास्त्रीय अर्थ विचारात घेऊन सुद्धा मानववंशांच्या वर्गीकरणात अनेक अडचणी येतात.

इ.स. १९५१ मध्ये पॅरिस येथे मानवशास्त्रज्ञ (Anthropologists) व जननशास्त्रज्ञ (Gynacologists) यांची परिषद भरली होती. 'वंश' हा या परिषदेपुढील चर्चेचा मुख्य विषय होता. या परिषदेने वंश या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली. ''जे मानवगट परस्परांहून पूर्ण विकसित व प्रामुख्याने संक्रमणशील अशा शारीरिक वैशिष्ट्यांच्या बाबतीत भिन्न असतात अशा मानवगटांना 'वंश' अशी संज्ञा वापरावी.'' मानवजातीचे वर्गीकरण करणे सुलभ व्हावे म्हणून ही व्याख्या मान्य करण्यात आली परंतु या व्याख्येमुळे काही उपवंशांचा उल्लेख 'वंश' म्हणून केला जाण्याची शक्यता आहे तसेच काही मानवसमूहांचा कोणत्याच वंशात सहजतेने समावेश करता येणार नाही.

'वंश' या संकल्पनेच्या वरील व्याख्यांच्या अभ्यासाने वंशाची दोन प्रमुख लक्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतात. (अ) वंश ही जीवशास्त्रीय संकल्पना असून समान शारीरिक लक्षणे असणाऱ्या लोकांचा वंश बनतो, (ब) वांशिक गुण हे निश्चित, अपरिवर्तनशील व अनुवंश यंत्रणेद्वारे संक्रमित होणारे असतात. या लक्षणांचा उपयोग करून वंशाची सहज स्पष्ट होणारी व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते.

''निश्चित अशा शारीरिक गुणवैशिष्ट्यांचा संयोग असलेल्या व या गुणवैशिष्ट्यांचे मातापित्यांकडून अपत्यांमध्ये वंशदायाने हस्तांतरण होणाऱ्या व्यक्तींचा समूह म्हणजे वंश.''

**मानवी वंश वर्गीकरण निकष (Criteria) :**

वंश मानवाचे नाक, शरीराचा रंग, ओठ, केसांचा आकार व रंग आणि रक्तगट या शारीरिक वैशिष्ट्यांवर निश्चित केला जातो. या वंश गुणवैशिष्ट्यांचे अभ्यासकांनी दोन भागात वर्गीकरण केलेले आहे.

**(अ) निश्चित गुणवैशिष्ट्ये :** मानवाची उंची, डोक्याचा आकार व रुंदी, नाकाचा आकार इत्यादी घटकांचा यात समावेश होतो. या वैशिष्ट्यांचे मोजमाप करता येते.

**(आ) अनिश्चित गुणवैशिष्ट्ये :** कातडीचा रंग, डोळ्यांचा रंग, केसांचा रंग इत्यादी घटकांचा यात समावेश होतो. या वैशिष्ट्यांचे मोजमाप करता येत नाही.

**(अ) निश्चित लक्षणे (Definite Traits) :**

**(१) उंची (Stature) :** शरीराची उंची अथवा बांधा हे स्पष्टपणे मापन करता येणारे लक्षण आहे. उंची या लक्षणानुसार वंशीय वर्गीकरण अत्यंत सहजतेने करता येणे शक्य आहे. उदा. पिग्मी बुटके असतात. बुशमेन सुद्धा बुटके असतात. या आदिवासींची सरासरी उंची १३७ सें.मी. आहे तर त्या उलट पॅटॅगोनियातील आदिवासींची उंची सरासरी १९३ सें.मी. आहे. मानवाची सरासरी उंची १६७ सें.मी. मानली जाते. त्यापेक्षा जास्त उंची म्हणजे उंच बांधा व कमी उंची म्हणजे बुटका बांधा असे मानले जाते. वेद्दा, कादर, मॅलेनेशियन हे सर्व बुटकेच आहेत.

**निश्चित लक्षणे :**
(१) उंची
(२) रक्तगट
(३) डोक्याचा आकार
(४) नासिकांक

**(२) रक्तगट (Blood Groups) :** लॅंडस्टीनर यांनी मानवी रक्ताचे A, B, AB व O अशा चार गटांत वर्गीकरण केले. त्यानंतरच्या काळात Rh (+ve) व Rh (-ve) हा घटक विचारात घेऊन आणखी गट मानण्यात आले. प्रत्येक वंशाच्या व्यक्तींमध्ये विशिष्ट गटाचे रक्त आढळते. ते अन्य वंशांच्या व्यक्तींच्या रक्तापेक्षा वेगळे असते. त्यामुळे रक्तगट हे महत्त्वाचे शारीरिक लक्षण मानले जाते. पेशीमधील गुणूसत्रांमुळे (Genes) नव्या पिढीत रक्तगट निश्चित होतात.

वांशिक भिन्नता निश्चित करण्याच्या लक्षणात रक्तगट महत्त्वाचा घटक आहे. मानवी रक्तगटाचे मुख्य चार प्रकार आहेत. ए, बी, एबी व ओ हे चार प्रकार असून जगातील प्रत्येक मानवात वरील चार गटांपैकी एक रक्तगट आढळतो. कॉकेसाइडवंशीय मानवात ए गटाचे प्रमाण जास्त आढळते तर मंगोलाइडवंशीय मानवात बी रक्तगटाचे प्रमाण जास्त आढळते. असे असले तरी रक्तगट हा मानववंश निश्चित करण्याचा गुणधर्म मानता येणार नाही.

**रक्तगटानुसार वांशिक वर्गीकरण**

| क्र. | वांशिक समूह | रक्तगटाच्या व्यक्ती (टक्के) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | O | A | B | AB |
| १. | अमेरिकन (गौर) | ४० | ४६ | १० | ४ |
| २. | अमेरिकन – निग्रो | ४४ | ३० | २२ | ४ |
| ३. | रेडइंडियन्स | १०० | – | – | – |
| ४. | रशियन्स | ३२ | ३४ | २५ | ९ |
| ५. | चिनी | ३४ | ३१ | २८ | ७ |

(अ) रक्तगटाच्या आधारे ऑटेनबर्न यांनी मानव वंशाचे वर्गीकरण पुढील प्रकारे केले आहे.

(१) युरोपीय, (२) रशियन (तुर्की व अरबी इ.), (३) हिंदू (व मंच्यूरियन, उ. चिनी, कोरियन, जिप्सी इ.), (४) आफ्रिकन (व दक्षिण अशियाई, निग्रो, मलायी इ.), (५) हुनानी (व जपानी, चीनी, हंगेरियन इ.), (६) पॅसिफिक अमेरिकन (व ऑस्ट्रेलियन, फिलीपिनी इ.)

(ब) रक्तगटाचा आधार घेऊन लहोवरी यांनी आठ वांशिक गट केले ते पुढीलप्रमाणे – (१) युरोपीय, (२) भूमध्यसागरी, (३) मंगोल, (४) आफ्रिकन, (५) इंडोनेशियन, (६) अमेर इंडियन, (७) ओशियानिक व (८) ऑस्ट्रेलियन.

**(३) डोक्याचा आकार :** डोक्याचा आकार मानवी वंशनिश्चिती करण्यातला महत्त्वाचा घटक मानला जातो. डोक्याची लांबी व रुंदी याच्या गुणोत्तर प्रमाणाच्या साहाय्याने वांशिक भिन्नता निश्चित केली जाते. या गुणोत्तर प्रमाणाला शीर्षभिसूचक निर्देशांक असे म्हणतात.

डोक्याची कमाल लांबी १०० मानून डोक्याची रुंदी व लांबी यांचे गुणोत्तर काढतात. त्याला मस्तिष्कांक (Cepatic Index) अथवा मस्तिष्क सूचक निर्देशांक असे म्हणतात. डोक्याची रुंदी व लांबी यांच्या गुणोत्तराच्या टक्केवारीस मस्तिष्कांक असे म्हणतात अशी व्याख्या करता येते. मस्तिष्कांक काढण्याचे सूत्र पुढीलप्रमाणे –

$$\text{मस्तिष्कांक (Cephalic Index)} = \frac{B \times 100}{L}$$

| क्र. | डोक्याचा प्रकार | मस्तिष्कांक | | वांशिक समूह |
|---|---|---|---|---|
| | | कवटी | डोके | |
| १. | लांबट डोक्याचे (Delico cephalic) | ७४.९९ | ७६.९९ | अमेरिकन निग्रो उत्तर भारतीय |
| २. | मध्यम डोक्याचे (Meso cephalic) | ७५ ते ७९.९९ | ७७ ते ८१.९९ | युरोपीय |
| ३. | रुंद डोक्याचे (Brachy cephalic) | ८० पेक्षा जास्त | ८२ पेक्षा जास्त | ईशान्य भारतीय |

**(४) नासिकांक (Nasal Index) :** नाकाची लांबी, रुंदी व उंची मोजता येते. शिवाय नाकाचा आकार चटकन लक्षात येतो. त्यामुळे वंशीय वर्गीकरणासाठी नाकाचा आकार हे शारीरिक लक्षण उपयुक्त ठरते. भुवयांच्या मध्ये किंचित खालच्या बाजूस नाकाची सुरुवात होते तेथून वरच्या ओठावर नाक चिकटलेले असते तेथपर्यंत नाकाची लांबी मोजली जाते. दोन्ही नाकपुड्यांच्या बाह्य भागापासून रुंदी मोजली जाते. नाकाची रुंदी व लांबी यांच्या गुणोत्तराच्या शेकडा प्रमाणाला नासिकांक असे म्हणतात.

$$\text{नासिकांक (Nasal Index)} = \frac{\text{नाकाची रुंदी x १००}}{\text{नाकाची लांबी}}$$

वंशनिश्चितीच्या शारीरिक लक्षणांत नाकाचे मोजमाप महत्त्वाचे असते. नाकाची लांबी व रुंदी यांच्या गुणोत्तरास नासिकाभिसूचक निर्देशांक असे म्हणतात. नासिकाभिसूचक = नाकाची रुंदी ÷ नाकाची लांबी × १०० हा नासिकाभिसूचक निर्देशांक ७० पेक्षा कमी असेल तर लांब नाक, निर्देशांक ७० ते ८३.९ असेल तर चपटे नाक व ८४ पेक्षा जास्त असेल तर रुंद नाक असे मानले जाते.

**(आ) अनिश्चित लक्षणे :**

**(१) त्वचेचा रंग :** त्वचेच्या रंगावरून वांशिक-निश्चिती केली जाते. सर्वसाधारणपणे त्वचेच्या रंगावरून गोरा, पीत व काळा असे वंशाचे वर्गीकरण केले जाते. कॉकेसॉईड गोरा, मंगोलॉईड पीत तर निग्रोईडवंशीय मानव काळ्या रंगाचा असतो. त्वचेचा रंग रंगद्रव्य व रक्तवाहिन्यांची त्वचेखालील खोली याबर अवलंबून असतो. रंगद्रव्याचे प्रमाण कमी व त्वचेखालील रक्तवाहिन्या दिसत असतील तर रंग फिकट गौर असतो. रंगद्रव्याचे प्रमाण जास्त असेल तर काळा वर्ण असतो.

**त्वचेच्या वर्णानुसार वर्गीकरण :**

**(अ) गौरवर्णीय (Leucodermi) :** युरोप, पश्चिम आशिया, उत्तर आफ्रिका व पॉलिनेशियातील लोक गौर वर्णाचे आहेत. कुवियरने या गटाला कॉकेशियन असे नाव दिले आहे.

**(ब) पितवर्णीय (Xanthodermi) :** आशियातील मंगोलवंशीय तसेच बुशमेन व हटेंटॉट या जमातींचे लोक पिवळ्या वर्णाचे आहेत.

**(क) कृष्णवर्णीय (Melanodermi) :** निग्रो वंशाचे लोक काळ्या रंगाचे आहेत. याशिवाय मेलॅनेशिया, ऑस्ट्रेलिया येथील मूळचे रहिवासी सुद्धा कृष्णवर्णीयच आहेत. वर्णपीतक (Carotine) व हिमोग्लोबिन यांच्या अभावी त्वचेला काळा रंग प्राप्त होतो.

**(२) डोळे व पापण्या (Colour of Eyes and Folds) :** वंशीय वर्गीकरणाच्या दृष्टीने हे लक्षण महत्त्वाचे नाही परंतु माणसाची शारीरिक वैशिष्ट्ये पाहताना डोळ्यांच्या रंगाची नोंद केली जाते. डोळ्यांच्या बाहुलीवर डोळ्यांचा रंग अवलंबून असतो. सामान्यपणे डोळ्याच्या बाहुलीचा रंग काळा असतो. त्यात काळेपणा कमी असेल तर डोळे निळे दिसतात. कॉकेशियन वंशांच्या लोकांचे डोळे तिरके (Slanting) असतात. काही वंशांच्या लोकांच्या पापण्या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.

**अनिश्चित लक्षणे :**
(१) त्वचेचा रंग
(अ) गौरवर्णीय
(ब) पितवर्णीय
(क) कृष्णवर्णीय
(२) डोळे व पापण्या
(३) केस

**(३) केस (Hair) :** रूस बेनेडिक्ट टेलर आणि डेनिकर यांच्या मते मानववंशाच्या वर्गीकरणात केसांच्या प्रकारांना निश्चित महत्त्व आहे. काहीवेळा अन्य लक्षणांच्या बाबतीत संभ्रमाची परिस्थिती असेल तर केसांच्या प्रकाराच्या आधारे वंशनिश्चिती करता येते. जसे मेलॅनेशियन्स हे निग्रोवंशाचे आहेत हे केसांच्या प्रकारांच्या आधारे स्पष्ट करता येते. केसांचा प्रकाश, रंग, बनावट, संख्या व केसांचा आडवा छेद यांच्या आधारे आधुनिक मानववंशाचे वर्गीकरण करणे अधिक सोयीचे आहे असे काही मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे.

•••

# ५. भारताची लोकसंख्या

(Population of India)

**प्रश्न १ : भारतातील लोकसंख्येची घनता स्पष्ट करा? किंवा**

**भारतातील लोकसंख्येची घनता कोणकोणत्या घटकावर अवलंबून असते ते स्पष्ट करा?**

**उत्तर :** मानव संस्कृतीच्या प्रारंभापासूनच लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये याविषयी लोकांच्या मनात जिज्ञासा होती. सर्व सजीव संसाधनांमध्ये मानव हे अतिशय महत्त्वाचे संसाधन मानले जाते. देशाच्या आर्थिक विकासासाठी नैसर्गिक संसाधने आवश्यक असतात परंतु संसाधनांचा विकास घडवून आणण्यासाठी, त्यांचा सुनियोजित वापर करून देशाची प्रगती साधण्यासाठी मानवी प्रयत्न आवश्यक असते. मानव हा विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक व संसाधन विकासाचा केंद्रबिंदू असतो. लोकसंख्येच्या वितरणाच्या अभ्यासात लोकसंख्येची घनता, लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक व लोकसंख्येचे प्रादेशिक वितरण यांचा समावेश होतो. भूगोलामध्ये लोकसंख्येच्या वितरणाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

**लोकसंख्येची घनता :**

एक चौरस किलोमीटर क्षेत्रात किती लोक राहतात हे स्पष्ट करणारा आकडा म्हणजे लोकसंख्येची घनता होय. घनता मापनाच्या अनेक पद्धती आहेत. देशाच्या लोकसंख्येला क्षेत्रफळाने भागून येणाऱ्या अंकाला गणिती घनता असे म्हणतात. भारतातील लोकसंख्येचे घनत्व २००१ च्या जनगणनेनुसार ३२४ आहे. १९९१ ते २००१ या दरम्यान राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लोकसंख्येच्या घनत्वामध्ये वाढ झालेली आहे. भारतात पश्चिम बंगाल हे राज्य सर्वाधिक लोकसंख्येचे राज्य आहे. २००१ नुसार पश्चिम बंगालचे घनत्व ९०४ होते. बिहारचा दुसरा क्रमांक आहे तर घनत्वानुसार केरळ तिसऱ्या स्थानावर आहे.

लोकसंख्येची घनता अनेक घटकांवर अवलंबून असते. शेतजमिनीची सुपीकता, हवामान, पाऊस, प्राकृतिक रचना, सिंचन सुविधा, कृषी-औद्योगिक व व्यापारी प्रगती इत्यादी काही प्रमुख घटक आहेत. भारतामध्ये लोकसंख्येच्या घनतेवर वरील सर्व घटकांचा स्पष्ट परिणाम दिसून येतो. जागतिक लोकसंख्येच्या १५% लोकसंख्या भारतात असून भारताचे एकूण क्षेत्रफळ जागतिक क्षेत्रफळाच्या केवळ २.४% आहे. लोकसंख्येची घनता भारतात सारखी वाढत आहे. सध्या असलेली भारतातील लोकसंख्येची घनता जागतिक लोकसंख्येच्या ८ पट झाली आहे. भारतात विविध राज्यांत लोकसंख्येची घनता वेगवेगळी आहे. दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाची घनता सर्वाधिक म्हणजे ९, २९४ (२००१ नुसार) तर सर्वांत कमी अरुणाचल प्रदेशाची १३ (२००१ नुसार) आहे.

पुढील सारणीमध्ये भारतातील लोकसंख्येच्या घनतेमध्ये गेल्या दशकात झालेली वाढ दर्शविली आहे. भारताचा भूभाग जगातील भूभागाच्या केवळ २.४६% आहे आणि जगातील १६% लोकसंख्या या देशात राहते. लोकसंख्या ही सतत वाढत आहे परंतु भूक्षेत्र मात्र स्थिरच आहे. त्यामुळे देशातील लोकसंख्येची घनता वेगाने वाढत आहे. लोकसंख्येची घनता पुढील सूत्राच्या आधारे काढली जाते.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशातील एकूण लोकसंख्या}}{\text{त्याच प्रदेशातील क्षेत्रफळ}}$$

भारतातील केंद्र आणि राज्याची लोकसंख्येची घनता २००१ नुसार पुढीलप्रमाणे आहे.

| केंद्र आणि राज्यशासित प्रदेश (२००१ नुसार) | घनता (प्रति वर्ग कि.मी.) | | केंद्र आणि राज्यशासित प्रदेश (२००१ नुसार) | घनता (प्रति वर्ग कि.मी.) | |
|---|---|---|---|---|---|
| | २००१ नुसार | १९९१ नुसार | | २००१ नुसार | १९९१ नुसार |
| १. दिल्ली | ९,२९४ | ६,३५२ | १९. आंध्रप्रदेश | २७५ | २४२ |
| २. चंदीगड | ७,९०३ | ५,६३२ | २०. कर्नाटक | २७५ | २३५ |
| ३. पाँडेचरी | २,०२९ | १,६८३ | २१. गुजरात | २५८ | २११ |
| ४. लक्षद्वीप | १,८९४ | १,६१६ | २२. ओरिसा | २३६ | २०३ |
| ५. दमन आणि दीव | १,४११ | ९०७ | २३. मध्यप्रदेश | १९६ | १५८ |
| ६. पश्चिम बंगाल | ९०४ | ७६७ | २४. राजस्थान | १६५ | १२९ |
| ७. बिहार | ८८० | ६८५ | २५. उत्तरांचल | १५९ | १३३ |
| ८. केरळ | ८१९ | ७४९ | २६. छत्तीसगड | १५४ | १३० |
| ९. उत्तर प्रदेश | ६८९ | ५४८ | २७. नागालँड | १२० | १०३ |
| १०. पंजाब | ४८२ | ४०३ | २८. हिमाचल प्रदेश | १०९ | ९३ |
| ११. तामिळनाडू | ४७८ | ४२९ | २९. मणिपूर | १०७ | ८२ |
| १२. हरियाणा | ४७७ | ३७२ | ३०. मेघालय | १०३ | ७९ |
| १३. दादरा आणि नगर हवेली | ४४९ | २८२ | ३१. जम्मू काश्मीर | ९९ | ७४ |
| १४. गोवा | ३६३ | ३१६ | ३२. सिक्कीम | ७६ | ५७ |
| १५. आसाम | ३४० | २८६ | ३३. अंदमान-निकोबार | ४३ | ३४ |
| १६. झारखंड | ३३८ | २७४ | ३४. मिझोरम | ४२ | ३३ |
| १७. महाराष्ट्र | ३१४ | २५७ | ३५. अरुणाचल प्रदेश | १३ | १० |
| १८. त्रिपुरा | ३०४ | २६३ | | | |

**भारतातील लोकसंख्येच्या घनत्वाची वैशिष्ट्ये :**

(१) इ.सन २००१ नुसार भारतात दर चौ.कि.मी. ३२४ व्यक्ती राहतात तर इ.स. १९२१ पर्यंत घनतेमध्ये विशेष वाढ झाली नाही.

(२) इ.सन १९२१ ते १९५१ या काळात भारतातील लोकसंख्येची घनता ८१ वरून १७७ पर्यंत वाढली. भारतातील माफक लोकसंख्या वाढीचा हा काळ होता.

(३) इ.सन १९४१ ते ५१ या काळात घनता १०३ वरून ११७ पर्यंत वाढली. देशाच्या फाळणीमुळे निर्वासितांचे लोंढे आले त्याचा हा परिणाम आहे.

(४) इ. सन १९५१ ते २००१ या काळात देशातील लोकसंख्येची घनता ११७ वरून ३२४ पर्यंत वाढली. देशाच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ होऊन लोकसंख्येच्या प्रस्फोटाची स्थिती निर्माण झाल्यामुळे हे घडले.

(५) २००१ नुसार लोकसंख्येची घनता ३२४ आहे तर २०११ मधील प्रक्षेपित घनता ४०० होईल यावरून भारतातील लोकसंख्येची स्थिती स्पष्ट होते.

(६) भारतात दिल्ली या केंद्रशासित प्रदेशात सर्वाधिक म्हणजे ९,२९४ लोक राहतात त्यानंतर पश्चिम बंगाल ९०४, बिहार ८८०, केरळ ८१९ व उत्तर प्रदेश ६८९ हे सर्व प्रदेश अति जास्त घनतेचे आहेत.

(७) पश्चिम बंगाल, बिहार, केरळ, उत्तर प्रदेश, पंजाब या राज्यात लोकसंख्येची घनता ५०० ते १००० यांच्यादरम्यान आहे. ही जास्त घनतेची राज्ये आहेत.

(८) तामिळनाडू, गोवा, हरियाणा, आसाम, झारखंड या राज्यांत लोकसंख्येची घनता ३०७ ते ४०० पर्यंत आहे. वरील सर्व राज्यात घनता राष्ट्रीय सरासरी ३६७ पेक्षा जास्त आहे.

(९) महाराष्ट्र, त्रिपुरा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांत लोकसंख्येची घनता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी परंतु २०० ते २६७ आहे. या राज्यातील घनता मध्यम स्वरूपाची आहे.

(१०) ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरांचल, छत्तीसगढ या राज्यात लोकसंख्येची घनता १५० ते २०० च्या दरम्यान आहे. ही सर्व राज्ये लोकसंख्येच्या कमी घनतेची आहेत.

(११) सिक्कीम ७६, अंदमान-निकोबार ४३, मिझोरम ४२, अरुणाचल प्रदेश १३ ही अत्यंत कमी घनतेची राज्ये आहेत. अरुणाचल प्रदेश हे देशातील सर्वात कमी लोकसंख्येच्या घनतेचे राज्य आहे.

कोणत्याही देशात लोकसंख्येची घनता व तेथील आर्थिक विकास यामध्ये समप्रमाणात संबंध असतोच असे नाही. युरोपमध्ये लोकसंख्येची घनता जास्त आहे परंतु पश्चिम युरोपमधील अनेक देश आर्थिकदृष्ट्या समृद्ध आहेत. जपानची लोकसंख्येची घनता ३१६ म्हणजे भारतापेक्षा जास्त असूनही तो देश आर्थिकदृष्ट्या विकसित व समृद्ध आहे. याउलट बांगला देशमध्ये लोकसंख्येची घनता जास्त असूनही तो देश अविकसित व आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. अमेरिका, रशिया, जपान, इंग्लंड या राष्ट्रांची घनता कमी असूनही ही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या समृद्ध व महासत्ता राष्ट्रे म्हणून उदयास आली आहेत.

अशाप्रकारे भारतातील लोकसंख्येचे घनत्व स्पष्ट होते.

**प्रश्न २ : भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा. किंवा**
**भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणामांची चर्चा करा.**

**लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :**
(अ) प्रस्तावना
(ब) प्राकृतिक घटक
  (१) प्राकृतिक रचना
  (२) हवामान
  (३) मृदा
  (४) भूरचना
  (५) नैसर्गिक वनस्पती
  (६) खनिज संपत्ती
(क) आर्थिक घटक
  (१) औद्योगिक परिणाम
  (२) दळणवळण
  (३) जल सिंचन
  (४) नागरीकरण
  (५) आर्थिक व्यवसाय
(ड) सामाजिक व राजकीय घटक

**उत्तर : (अ) प्रस्तावना :** भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक पैलूशी देशाच्या लोकसंख्येचा घनिष्ट संबंध आहे. भारतातील नैसर्गिक संसाधनांचा विकास, भारतीय लोकांच्या शेती, पशुपालन, उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक, लोकसंख्येतील वाढ, वितरण, लोकसंख्या संरचना व लोकसंख्येच्या इतर अनेक घटकांवर अवलंबून आहे.

लोकसंख्येच्या वितरणावर ग्रामीण व शहरी क्षेत्राचा परिणाम झालेला आहे. ज्या भूप्रदेशात शेतीस अनुकूल पर्यावरण असेल त्या प्रदेशात ग्रामीण लोकसंख्या अधिक प्रमाणात आढळते. अधिक पर्जन्य व दाट लोकसंख्या असा आश्चर्यकारक योगायोग भारतातील मैदानी प्रदेशात आढळून येतो. ज्या भागात पर्जन्य अधिक तेथे कृषी उत्पादकता ही जास्त असते. अशा प्रदेशात दाट लोकसंख्या आढळते. याउलट कमी पाऊस असलेल्या प्रदेशात विरळ लोकसंख्या असते. ज्या प्रदेशात शेतीची उत्पादनक्षमता जास्त आहे त्या प्रदेशात लोकसंख्येची घनता अधिक असते व लोकसंख्येच्या वितरणावर त्याचा परिणाम होत असतो. शहराचे कार्यात्मक महत्त्व जितके अधिक असेल तितक्या अधिक प्रमाणात लोकसंख्येवर परिणाम होतो. भारतातील काही प्रदेशांत प्राकृतिक पर्यावरणाची पोषणक्षमता जास्त आहे तसेच ते मानवी आरोग्यास अनुकूल आहे. मानवी आर्थिक क्रियांचा चांगला विकास झाल्यामुळे अशा प्रदेशात जास्त लोकसंख्या वास्तव्य करते.


भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकात भूरचना, भूस्तररचना व खनिजे, हवामान, भौगोलिक स्थान, जल संसाधन, मृदा, वन संसाधन इत्यादी घटकांचा दूरगामी परिणाम होतो. भारताच्या लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**(ब) प्राकृतिक घटक :**

**(१) प्राकृतिक रचना :** प्राकृतिक रचनेचा प्रभाव लोकसंख्येच्या वितरणावर झालेला आढळतो. भारतातील सर्वात दाट लोकसंख्या सखल, सपाट मैदानी भागात केंद्रित झालेली तर आसाम, मेघालय, नागालँड, मध्यप्रदेश, जम्मू-काश्मीर इत्यादी पर्वतीय, डोंगराळ भागात कृषी व्यवसाय व वाहतुकीस प्रतिकूल परिस्थिती असल्यामुळे लोकसंख्या विरळ आहे. भारतातील बराचसा प्रदेश काळ्या, सुपीक, रेगूर व गाळाच्या मृदेने व्यापलेला आहे. मृदा पिकांच्या वाढीसाठी अतिशय पोषक असतात. अशा प्रदेशात लोकसंख्या दाट असते. भारताच्या पूर्व व पश्चिम किनारी मैदानात सखल प्रदेशात भात शेतीचा विकास झालेला आहे. पूर्व किनारी मैदानापेक्षा पश्चिम किनारी मैदानात लोकवस्ती दाट आहे म्हणूनच केरळमध्ये लोकसंख्येची घनता जास्त आहे. सतलज-गंगेचे मैदान व किनारी मैदाने या प्रदेशांचे क्षेत्रफळ भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४३% आहे. या प्रदेशात देशाची ७०% लोकसंख्या आहे.

अशाप्रकारे प्राकृतिक रचनेचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर झालेला आहे.

**(२) हवामान :** पर्यावरणाच्या इतर कोणत्याही घटकांपेक्षा हवामानाचा लोकसंख्येच्या वितरणावर सर्वाधिक परिणाम होत असतो. मृदा, पाणी पुरवठा, वनस्पती, शेती व्यवसाय या सर्वांचा हवामानाच्या घटकांवर परिणाम होतो. हे सर्व घटक लोकसंख्येचे वितरण निश्चित करीत असतात. हिमालयातील तराईचा प्रदेश, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, नागालँड, मिझोरम इत्यादी प्रदेश पर्वतीय हवामानाच्या छायेखाली असल्यामुळे येथे अतिवृष्टी होते. हे सर्व विरळ वस्तीचे प्रदेश आहेत. राजस्थान, कच्छरणमध्ये रुक्ष व उष्ण-वाळवंटी हवामान असल्यामुळे या प्रदेशात लोकवस्ती अतिशय विरळ आहे. भारतीय महावाळवंटाचा विस्तृत भाग निर्मनुष्य आहे त्याचप्रमाणे पठारावरील अवर्षणप्रवण क्षेत्रात लोकसंख्या विरळ आहे.




आकृती : लोकसंख्येची घनता (वितरण) १९९१

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर तसेच पूर्व किनाऱ्याच्या विस्तृत भागात मुबलक पाऊस पडतो त्यामुळे या प्रदेशातील लोकसंख्या दाट आहे. उदा. केरळ, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्रातील कोकण भाग इत्यादी. अशाप्रकारे हवामानाचा लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होतो.

**(३) मृदा :** कृषी उत्पादनाकरिता मृदा अत्यंत महत्त्वाच्या असतात. सुपीक मृदांच्या प्रदेशात शेतीचा विकास होत असतो. भारतातील पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश व बिहारचा सुपीक मैदानी प्रदेश, गंगेच्या त्रिभूज प्रदेशाचा सुपीक मृदांचा प्रदेश हे सर्व दाट वस्तीचे प्रदेश आहेत. महाराष्ट्राच्या पठारावरील काळ्या सुपीक मृदांच्या प्रदेशात कापसाची शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यामुळे या प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आहे तर पश्चिम बंगालमध्ये सुपीक मृदांमुळे वर्षांतून तीन पिके घेतली जातात. यामुळे लोकसंख्या या प्रदेशात जास्त आहे.

भारतातील राजस्थानचा वाळवंटी प्रदेश, मध्यप्रदेशाचा दक्षिण भाग, काश्मीरचा उत्तर व पूर्व भाग हे सर्व प्रदेश अतिशय विरळ वस्तीचे आहेत कारण या प्रदेशांची मृदा ओसाड, रुक्ष व नापीक असल्यामुळे या प्रदेशात लोकवस्ती विरळ आहे.

**(४) भूरचना :** भारताच्या भूरचनेवर मृदा प्रकार, भूजल साठा, बांधकाम साहित्य, खनिजे इत्यादी घटकांवर परिणाम झालेला आहे. भूगर्भरचनेचा लोकसंख्येच्या वितरणावर अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. भारताच्या दख्खन पठारावर दख्खन लाव्हापासून काळी सुपीक मृदा निर्माण झाली आहे. याउलट भूरचनेचा परिणाम म्हणजे पश्चिम किनारी प्रदेशात व पश्चिम घाटात जांभ्याचे थर असलेल्या प्रदेशात लोकवस्ती विरळ आहे. भूगर्भात भ्रंशरेषा असलेल्या पठाराच्या पश्चिम भागातील भूकंपग्रस्त प्रदेश लोकवस्ती आकर्षून घेऊ शकत नाही.

अशाप्रकारे भूगर्भरचनेचा परिणाम भारताच्या लोकसंख्येच्या वितरणावर होत असतो.

**(५) नैसर्गिक वनस्पती :** लोकसंख्येच्या वितरणावर नैसर्गिक वनस्पतींचाही प्रभाव पडत असतो. भारतातील पश्चिम घाटमाथा, ईशान्य भारतातील लुचाई, खासी, गारो, जैतिया व काचर टेकड्या, हिमालयाच्या पायथ्याचा तराईचा प्रदेश, अंदमान-निकोबार बेट इत्यादी भूप्रदेश दाट जंगलांनी, नैसर्गिक वनस्पतींनी व्यापलेला आहे. नैसर्गिक वनस्पती जास्त असल्यामुळे हे प्रदेश विरळ वस्तीचे आहेत. महाराष्ट्राचा पूर्व भाग व मध्य प्रदेशचा बस्तर जिल्हा दाट वनांमुळे विरळ वस्तीचा आहे. मोसमी पानझडी वनांच्या प्रदेशातील पर्यावरण शेतीस अनुकूल असल्यामुळे या प्रदेशात वृक्षतोड केली जाते. असे प्रदेश शेतीसाठी आणण्यात आले असून तेथे लोकवस्ती

मध्यम स्वरूपाची आहे. जल संसाधनांचाही लोकसंख्येवर प्रभाव पडत असतो. भारतातील नद्यांच्या काठी लोकवस्ती अतिशय दाट आहे. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये गंगेच्या मैदानी प्रदेशात जल संसाधन विपुल प्रमाणावर असल्यामुळे लोकसंख्या जास्त आहे. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात लोकसंख्येची घनता अतिशय कमी आहे.

**(६) खनिज संपत्ती :** खनिज साधनसंपत्ती असलेल्या प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त असते. आधुनिक उद्योगधंद्यांसाठी खनिजे व ऊर्जा साधने आवश्यक असतात. भारतातील महाराष्ट्राचा मध्य भाग, बिहारमधील छोटा नागपूरचे पठार, ओरिसाचा उत्तर भाग या सर्व प्रदेशात दगडी कोळसा, लोह खनिज व इतर खनिजांच्या साठ्यामुळे खाण उद्योगाचा व त्यावर आधारित उद्योगांचा विकास झाला आहे त्यामुळे या प्रदेशात लोकसंख्येची घनता वाढली आहे. भारताचा पूर्व व पश्चिम किनारी प्रदेश सागरी सान्निध्यामुळे तसेच सतलज गंगेचा मैदानी प्रदेश नदीतटीय स्थानामुळे दाट वस्तीचा आहे.

**(क) आर्थिक घटक :**

भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर दळणवळण व वाहतुकीची साधने, औद्योगिक विकास, आर्थिक विकास, नागरीकरण, व्यवसायांचा विकास इत्यादी आर्थिक घटकांचा परिणाम दिसून येतो. हे आर्थिक घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) औद्योगिक परिणाम :** भारतात मोठे उद्योगक्षेत्र निर्माण झाल्यामुळे साधनसामुग्रीची सोय उपलब्ध असल्यामुळे मुंबई–पुणे–अहमदाबाद–बडोदा औद्योगिक विभाग, कानपूर–दिल्ली–अमृतसर परिसर, पश्चिम बंगाल व बिहारचा औद्योगिक पट्टा इत्यादी भूप्रदेशात औद्योगीकरणामुळे व आर्थिकदृष्ट्या विकसित असल्यामुळे या ठिकाणी लोकसंख्या अधिक दाट झालेली आहे. महाराष्ट्र पठारावरील कृषी व साखर उद्योगाचा विभाग सुद्धा आर्थिकदृष्ट्या प्रगत असून या सर्व प्रदेशांत लोकवस्ती जास्त आहे.

**(२) दळणवळण :** लोकसंख्येच्या वितरणावर दळणवळण व वाहतुकीची साधने यांचा प्रभाव पडत असतो. संदेशवहनांची सुविधा, हवाईमार्ग, लोहमार्ग, रस्ते, जलमार्ग इत्यादी साधनांमुळे सुगमता वाढते व कच्च्या व पक्क्या मालाची वाहतूक करता येते. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धी होते. अशा साधनांमुळे लोकसंख्या व लोकवस्ती वाढते. भारतातील मुंबई व कलकत्ता ही आंतरराष्ट्रीय सागरी मार्गावरील महत्त्वाची बंदरे आहेत. त्यांची व्यापारी व औद्योगिक केंद्रे म्हणून वाढ झाली व तेथील लोकवस्ती वाढली आहे. भारताच्या पूर्व व पश्चिम किनारी प्रदेशात सागर किनाऱ्यावर महत्त्वाची बंदरे असल्यामुळे व रस्ते, लोहमार्गाने अंतर्गत भाग जोडला असल्यामुळे किनारी प्रदेशात लोकवस्ती दाट आहे.

सतलज–गंगेच्या मैदानी प्रदेशात रस्ते व लोहमार्ग यांचे जाळे निर्माण झाल्यामुळे व वाहतुकीच्या सुविधांमुळे हा प्रदेश दाट वस्तीचा आहे तर ईशान्य भारत, मध्य भारत, वायव्येकडील वाळवंटी प्रदेश, काश्मीर, हिमाचल प्रदेश, नागालँड, मेघालय, मध्य प्रदेशचा डोंगराळ भाग इत्यादी प्रदेशात वाहतुकीच्या सुविधांचा विकास न झाल्यामुळे तेथे लोकवस्ती विरळ आहे.

**(३) जल सिंचन :** जल सिंचन सुविधांमुळे शेतीचा विकास होतो. शेती उत्पादनावर आधारित उद्योगधंद्यांची वाढ होते. भारतातील बिहारचा उत्तर भाग, हरियाणा पठारावरील जलसिंचित पट्टा, कर्नाटक पठार, पंजाब, कर्नाटक पठार इत्यादी भूप्रदेशात लोकसंख्या, लोकवस्ती वाढली आहे. अशाप्रकारे जल सिंचनाच्या उपलब्धतेमुळे लोकसंख्या वितरणावर अनुकूल परिणाम झालेला आहे.

**(४) नागरीकरण :** उद्योगधंदे व व्यापार यांच्या वृद्धीमुळे आर्थिक विकास होतो व नागरीकरणाचा, औद्योगीकरणाचा वेगही वाढतो. वाढत्या नागरीकरणामुळे महानगरांची संख्या वाढत आहे. भारतातील मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, हैद्राबाद, बंगलोर, अहमदाबाद, पुणे, कानपूर इत्यादी शहरे ५० लाखांपेक्षा जास्त वस्तीची आहेत. नागरीकरणामुळे जलद आर्थिक विकास झालेला आहे व लोकसंख्येच्या वितरणावर अनुकूल परिणाम झालेला आहे.

**(५) आर्थिक व्यवसाय :** ज्या भूप्रदेशात विस्तृत शेती, औद्योगीकरण, बाजारपेठ हे आर्थिक व्यवसाय प्रगत झालेले असतात ते प्रदेश जास्त लोकवस्ती आकर्षून घेतात. शेती विकासामुळे भारतातील पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहारचा मैदानी प्रदेश, महाराष्ट्र पठारावरील जलसिंचित क्षेत्रे इत्यादी प्रदेशांत लोकवस्ती दाट झालेली आहे. पश्चिम बंगालमध्ये शेती, उद्योगधंदे, व्यापार व नागरीकरण यांचा विकास झालेला आहे. आर्थिक व्यवसायाच्या समृद्धतेमुळे लोकसंख्या व लोकवस्ती वाढत आहे.

**(ड) सामाजिक व राजकीय घटक :**

भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणाऱ्या इतर घटकांमध्ये सामाजिक व राजकीय घटकांचा प्रभाव दिसून येतो. धर्म, संस्कृती, कुटुंबपद्धती, सामाजिक एकजिनसीपणा या सामाजिक घटकांचा लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होतो. हिंदूंमधील बालविवाह व मुस्लिमांतील बहुपत्नीत्व, एकत्र कुटुंबपद्धती यामुळे लोकसंख्या वाढत असून लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होतो.

साम्राज्ये, युद्धे, अधिकार, यादवी, वंशसंहार इत्यादी ऐतिहासिक घटकांचा लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम दिसून येतो. भारतात आर्यांचे आगमन, मुसलमान व मुघलांचे आगमन वायव्येकडून झाल्यामुळे उत्तर भारतात वायव्येकडून सतत लोकसंख्येची भर पडत राहिली. भारतामध्ये झालेली फाळणी ही राजकीय घटनाही लोकसंख्येचा वितरणावर परिणाम करणारी घटना आहे. याचदरम्यान हिंदूंनी भारतात स्थलांतर केल्यामुळे लोकसंख्या वाढली आहे. आसाममध्ये चहाच्या मळ्यांचा विकास करण्यात आल्यामुळे बंगाल व नेपाळमधून अनेक लोकांनी आसाममध्ये स्थलांतर केले असल्यामुळे लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. भारतात ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे त्यामुळे लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होत आहे.

अशाप्रकारे भारतातील लोकसंख्येच्या वितरणावर प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय या घटकांचा परिणाम झालेला आहे.

**प्रश्न ३ : भारतातील लोकसंख्येचे प्रादेशिक वितरण स्पष्ट करा? किंवा**

**लोकसंख्येच्या घनतेनुसार भारताचे प्रमुख चार विभाग कोणते? प्रमुख चार विभागांचे वर्णन करा.**

**लोकसंख्येचे प्रादेशिक वितरण व भारताचे प्रमुख चार विभाग :**
प्रस्तावना
(१) अतिजास्त घनतेचा प्रदेश
(२) जास्त घनतेचा प्रदेश,
(३) मध्यम घनतेचा प्रदेश
(४) कमी घनतेचा प्रदेश

**उत्तर : प्रस्तावना :** जागतिक लोकसंख्येच्या १५% लोकसंख्या भारतात असून भारताचे एकूण क्षेत्रफळ जागतिक क्षेत्रफळाच्या केवळ २.४% आहे. लोकसंख्येची घनता भारतात सारखी वाढत आहे. भारतात विविध राज्यांत लोकसंख्येची घनता वेगवेगळी आहे. ज्या भूप्रदेशात पर्जन्य अधिक तेथे कृषी उत्पादकताही जास्त असून अशा प्रदेशांत लोकसंख्याही दाट आढळते. याउलट कमी पाऊस असलेल्या प्रदेशात विरळ लोकसंख्या असते. शहराचे कार्यात्मक महत्त्व जितके अधिक असेल तितक्या प्रमाणात घनता त्या शहरात आढळून येते. याशिवाय शेतीची उत्पादकक्षमता, वाहतुकीची सोय, मासेमारीस उपयुक्त असलेला जलाशय, वनोत्पादने गोळा करण्यासाठी उपयुक्त वने, स्थानिक बाजारपेठ इत्यादी घटकांचा लोकसंख्येच्या घनतेवर परिणाम होत असतो.

भारतातील लोकसंख्येचे प्रादेशिक वितरण विचारात घेतल्यास लोकसंख्येच्या घनतेनुसार भारताचे चार प्रमुख विभाग स्पष्टपणे दिसून येतात. ते विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) अतिजास्त घनतेचा प्रदेश :** भारतातील महानगर, केंद्रशासित प्रदेश, लहान राज्यांमध्ये लोकसंख्येची घनता अति जास्त म्हणजे दर चौ.कि.मी. ला १००० पेक्षा जास्त आहे. उद्योगधंदे व व्यापार यांच्या वृद्धीमुळे आर्थिक विकास होतो व औद्योगिक नगरे मोठ्या नागरी वस्तीची महानगरे बनतात. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, चंदीगड, मद्रास, हैद्राबाद, पुणे, बंगलोर, अहमदाबाद, कानपूर ही महानगरे व पाँडिचेरी, दमण-दीव व लक्षद्वीप इत्यादी केंद्रशासित प्रदेशात लोकसंख्येची घनता अति जास्त आहे. महानगरांमध्ये प्रशासकीय, औद्योगिक, व्यापारी, शैक्षणिक अशा विविध सेवा उपलब्ध असल्याने लोकसंख्येची घनता अति जास्त आहे.

**(२) जास्त घनतेचा प्रदेश :** भारतातील पश्चिम बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश, पंजाब, तामिळनाडू, केरळ या राज्यांत लोकसंख्येची घनता जास्त आहे. पूर्व व पश्चिम किनारपट्टीच्या सखल भागातही जास्त घनता आहे. पंजाब, प. बंगाल यादरम्यान गाळाची मृदा असलेले विस्तृत मैदान पसरलेले आहे. या भूप्रदेशात पाऊस मुबलक असून तांदूळ, ताग, गहू, ऊस, कापूस इत्यादी महत्त्वाची नगदी पिके आहेत. या प्रदेशात लोहमार्ग व रस्ते यांचे जाळे आहे. गंगा नदीचे खोरे वाहतुकीस सुलभ आहे. शेतीच्या उत्पादनाकरिता अनुकूल वातावरण, दळणवळणाची साधने, वाढते औद्योगीकरण या सर्व कारणांमुळे या भूप्रदेशाची पोषण क्षमता जास्त असल्याने लोकसंख्येची घनता या विभागात दर चौ.कि.मी. ७०० ते ९०० माणसे या क्षेत्रात राहतात.

जास्त घनतेच्या विभागात पश्चिम बंगाल ९०४, बिहार ८८०, केरळ ८१९ ही राज्ये समाविष्ट असतात. याशिवाय महाराष्ट्रातील कोकण किनारी भागात भातशेती, पोषक हवामान, बर्षातून दोन पिके असल्यामुळे ही परिस्थिती जास्त घनतेला पोषक आहे.

**(३) मध्यम घनतेचा प्रदेश :** लोकसंख्येच्या मध्यम घनतेच्या विभागात प्रामुख्याने पंजाब ४८२, गोवा ३६३, आसाम ३४०, महाराष्ट्र ३१४ या राज्यांचा समावेश होतो. उत्तर भारतातील हरियाणा व ईशान्य भारतातील त्रिपुरा ३०४ या राज्यात सुद्धा लोकसंख्येची घनता मध्यम स्वरूपाची आहे. दक्षिण भारतीय मध्यम घनतेचा प्रदेश प्रामुख्याने पठारी स्वरूपाचा आहे. डोंगरदऱ्यांचा प्रदेश, दाट वने, नापीक मृदा, उन्हाळ्यात पाण्याचे घटक प्रमाण ही या प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत. दळणवळण-वाहतुकीच्या मर्यादित सुविधा व औद्योगिक विकासाचा अभाव या सर्व प्रतिकूल घटकांमुळे वरील सर्व प्रदेशांत लोकसंख्येची घनता ३०० ते ५०० दर चौ. कि.मी आहे.